

# प्रिय पृथ्वी


अव्वैयार

चित्रे - मुरली नागापुझा


गीता धर्मराजन यांनी
तमिळमधून भाषांतरीत केली

कथाचे ३००एम थिंकबुक



प्रिय पृथ्वी



हिरवे शेत
किंवा जंगल



उंच टेकडी
किंवा दरी



तू आमची काळजी घेतेस



जेव्हा आम्ही तुझी काळजी घेतो!



प्रिय पृथ्वी
तू दीर्घायुषी हो!

# टाऽऽडा!

## 1 विचार करा

एक प्रसिद्ध लेखक म्हणाला होता, “इतर सर्व जी पुस्तकं वाचत आहेत, तीच तुम्ही वाचली तर तुम्ही इतरांसारखाच विचार कराल.” त्याचं म्हणणं योग्य आहे का?

## 2 विचारा

अव्वैयारने रचलेल्या २५ ओळींच्या कवितेतून तुम्ही काही नवीन शिकलात का? अव्वैयारच्या मोठ्या कल्पनेमध्ये काय विशेष आहे?

## 3 चर्चा करा

आपल्या प्रिय पृथ्वीला आनंदी करायला तुम्हाला एक कृती करायची असेल तर तुम्ही काय कराल?

## 4 कृती करा

झाडं ही आपल्या धरतीमातेची मुलं असतात. ती आपल्या हिरव्या मुलांच्या माध्यमातून आपला सांभाळ करते.

तुम्ही झाडाची काळजी घ्याल का आणि “धन्यवाद!” भूमी माते म्हणाल का?

## 5 साध्य करा

ही अव्वैयार यांची अजून एक कविता आहे

जर आपल्या या पृथ्वीवर<br>
असेल एक प्रेमळ मूल<br>
तिच्यामुळे मिळेल<br>
प्रत्येकाला पाऊस

प्रत्येकासाठी पाऊस आणणारे मूल तुम्ही होऊ शकाल का?

**प्रेमळ होण्याचे काही सोपे मार्ग जाणून घेण्यासाठी पुढील पानावर जा**

# प्रेमळ
## होण्याचे ९ मार्ग

मला पुढील प्रकारे प्रेमळ होता येईल

मदत करून

दुसऱ्यांसाठी आनंदी होऊन

इतरांशी चांगलं बोलून

मित्र-मैत्रिणींना प्रोत्साहन देऊन


इतरांची काळजी घेऊन

हसून

चांगल्या वागणुकीने

दुसरे बोलत असताना लक्ष देऊन

शेअर करून आणि जबाबदारी घेऊन




# वाचा!
# समजून घ्या!
# चर्चा करा!

## खूप खूप वर्षांपूर्वी

- साधारण २,५०० वर्षांपूर्वी संपूर्ण दक्षिण भारताला तमिळकम म्हणत असत.
- तमिळकमवर महान, हुशार राजे राज्य करत होते.
- या राजांना नृत्य, संगीत, कविता आणि चित्रकलेत रुची होती.
- त्यांनी अनेक कवींना निमंत्रित केले आणि त्यांची गाणी व कविता सादर करायला सांगितल्या.

## जेव्हा ४०० कवी गायले तेव्हा...

- इतिहासकार असं म्हणतात की त्या ठिकाणी तीन संगम झाले होते
- या संगमांना कविसंमेलनही म्हणतात
- संगम काळात सुमारे ४०० कवींनी तमिळ कविता लिहिल्या.
- अनेक कवींना त्यांचा सल्ला घेण्यासाठी राजांनी निमंत्रित केले होते.



## एके काळी अव्वैयार नावाची एक कवयित्री होती

- अव्वैयार या खूप हुशार, वृद्ध महिला होत्या
- त्या कवयित्री होत्या
- त्यांनी अनेक राजांना आणि सामान्यांना सल्ला दिला. तेसुद्धा तिचे ऐकत असत.
- काही जण म्हणतात अव्वैयार २३०० वर्षांपूर्वी होत्या.
- अव्वैयार दक्षिण भारतातील गावागावांतून अनवाणी फिरत असत, असं वर्णनही अनेक गोष्टींमध्ये आढळतं.
- त्या शेतकरी कुटुंबामध्ये राहत असत.
- त्यांनी रचलेल्या गाण्यांनी सर्वांना आनंद होत असे.

## देव कुठे आहे?

अव्वैयार प्राचीन देवळात विश्रांती घेत होत्या. त्यांचे पाय शंकराच्या मूर्तीकडे होते. पार्वती रागावली. ती अव्वैयारवर ओरडली, "तू एवढा अपमान कसा करू शकतेस?" अव्वैयार शांत बसली होती. मग ती म्हणाली, "मला माफ कर माते. मला एवढंच सांग की, देव कुठे नाही, तिथे मी पाय करेन."

पार्वती हसली आणि म्हणाली, "तुझं बरोबर आहे. देव सगळीकडेच आहे!"

**स्रोत : नॅशनल जिओग्राफिक, जेएसटओआर विकीपीडिया**

गीता धर्मराजन या तामिळनाडूतील तंजावर जिल्ह्यातील आहेत. त्या बालसाहित्यकार आहे. त्यांनी १९८८ साली कथाची स्थापना केली. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्यासाठी त्यांना पद्मश्रीसह अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

मुरली नागपुझा केरळमधील नागपुझा नावाच्या गावात वाढले. लहापणी त्यांना त्यांच्या आजुबाजूची हिरवळ आवडायची, त्यामुळे मुरली यांच्या चित्रांमध्येही भरपूर हिरवळ असते, त्यात नवल ते काय!

## KATHA

कथा ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून ही संस्था १९८८ साली सुरू झाली. आम्ही साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंतच्या क्षेत्रात अविरत काम करत आहोत. मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आम्ही गरीबीत जगत असलेल्या १,००,००० मुलांसोबत काम करत असून दर्जेदार पुस्तके आणि इतर प्रयत्नांच्या माध्यमातून त्यांना श्रेणी पातळीवर आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.

“भारताच्या शिरपेचातील शैक्षणिक हिरा.” - **नाओयुकी शिनोहारा, व्यवस्थापकीय उपसंचालक, आयएमएफ**

“कथा हा जगभरातील कल्पक प्रकल्पांसाठी एक आदर्श उदाहरण आहे, जो शहरातील सामान्य व नाट्यमय व्यथांना टिपतो.”
- **चार्ल्स लँड्री, द आर्ट ऑफ सिटी मेकिंग**

“कथाला मुलांबद्दल ममत्व आहे. म्हणूनच ही संस्था मुलांसाठी इतकी सुंदर पिक्चर बुक्स म्हणजेच चित्रपुस्तके तयार करते”
- **टाइम आउट**

“मुले ही कथाच्या पुस्तकांमध्ये जसा बदल घडवतात तसा त्यांच्या समुदायामध्ये शाश्वत आणि प्रत्यक्ष बदल घडवू शकतात, या संकल्पनेवर कथाचे काम आधारलेले आहे” - **पेपरटायगर्स**

**मुलांसाठी या कवितेचे इंग्लिश भाषांतर गीता धर्मराजन यांनी केले आहे**

प्रथम आवृत्ती २०२१
कॉपीराइट © कथा, २०२०, २०२१
भाषांतर कॉपीराइट © गीता धर्मराजन
पेंटिंग कॉपीराइट © मुरली नागापुझा
ए३, सर्वोदय एन्क्लेव्ह, श्री अरबिंदो मार्ग, नवी दिल्ली ११००१७
फोन: ९१-११ ४१४१ ६६००. ४१४१ ६६१०
ई-मेल: editors@katha.org, Website: www.katha.org
ISBN 978-93-82454-65-6

**आमचे मिशन :** प्रत्येक मूल उत्तम वाचेल आणि मजेसाठी वाचेल!

कथा ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून ही संस्था १९८८ साली सुरू झाली. आम्ही साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंतच्या क्षेत्रात अविरत काम करत आहोत. मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आम्ही गरीबीत जगत असलेल्या १,००,००० मुलांसोबत काम करत असून दर्जेदार पुस्तके आणि इतर प्रयत्नांच्या माध्यमातून त्यांना श्रेणी पातळीवर आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.

सर्व हक्क आरक्षित. प्रकाशकाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग पुनरुत्पादित केला जाऊ नये किंवा कोणत्याही प्रकारात वापरून नये.

या पुस्तकांच्या विक्रीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा १०% भाग वंचित विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी आणि आयुष्यभराच्या अध्ययन कार्यक्रमांना सहाय्य करण्यासाठी देण्यात येतो.



ही सर्व आयएलआर पुस्तके

क्ल्यु सीरिजमधील


मनोरंजनात्मक आणि अर्थपूर्ण वाचन करा








































FOR OUR BOOKS

www.books.katha.org

"कथा... भारतीय प्रकाशन इतिहासातील एक खास आणि वैशिष्ट्यपूर्ण चळवळ."
- द आयकॉनिक इकोनॉमिक टाइम्स

for children
a katha book
ISBN 978-93-88284-81-3
9 789388 284813
www.katha.org
₹ xxx